**पुणे महानगरपालिका**
मनपा मुख्य इमारत, शिवाजीनगर पुणे –४११००५
हेल्पलाईन नं: १८००२२२३६६, १८००१०३४५६६
हेल्पलाईन लिंक : http://cgrs.ibps.in
Visit us – www.punecorporation.org

# -:सुधारित जाहिरात / शुद्धिपत्रक :-

## कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) वर्ग-३, सरळसेवा भरती-२०२४

## (जाहिरात क्र.१/१५७९, दि. ०९/०१/२०२४)

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) वर्ग-३ या संवर्गातील एकूण ११३ जागा सरळसेवेने भरणेसाठी दैनिक वर्तमान पत्रामध्ये व पुणे महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात क्र.१/१५७९ दि.०९/०१/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली होती. त्यानुसार दि. १६/०१/२०२४ ते दि. ०५/०२/२०२४ या कालावधीत उमेदवारांना ऑनलाईन अर्ज सादर करणेची सुविधा पुणे महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली होती.

दरम्यानच्या काळात महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गकरीता आरक्षण अधिनियम २०२४, दि. २६/०२/२०२४ नुसार सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) वर्गाकरिता आरक्षणाची तरतूद विहित करण्यात आली असून सदर अधिनियमातील तरतुदी सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक:बीसीसी२०२४/प्र.क्र.७५-१६-क दि.२७/०२/२०२४ नुसार पुणे महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदभरतीस लागू आहे. त्यानुसार नव्याने लागू झालेले सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता १०% आरक्षण निश्चित करून कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) श्रेणी-३ या संवर्गातील एकूण १६९ पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाचा सुधारित तपशील खालीलप्रमाणे आहे:-

### कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (श्रेणी -३) उपलब्ध पदे व पद संख्या (सुधारित)

### ‘परिशिष्ठ-अ’

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एसईबीसी | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जागा | १६ | १९ | २ | ४ | ५ | ३ | ४ | ३७ | १७ | १८ | ४४ | १६९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणखालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | | |
| इतर (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | ४ | ६ | १ | २ | २ | २ | २ | १० | ५ | ५ | १५ | ५४ |
| १) महिला (३०%) | ४ | ५ | ० | १ | १ | १ | १ | १० | ५ | ५ | १३ | ४६ |
| २) माजी सैनिक (१५%) | २+३* | ३+१* | १* | १ | १+१* | ० | १ | ५+४* | ३ | २+२* | ६+१* | २४+१३* |
| ३) अंशकालीन (१०%) | १ | २ | ० | ० | ० | ० | ० | ३ | २ | २ | ४ | १४ |
| ४) खेळाडू (५%) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | ८ |
| ५) प्रकल्पग्रस्त (५%) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | ८ |
| ६) भूकंपग्रस्त (२%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| ७) दिव्यांग (४%) | a) LV- १, b) D, HH – २, c) OA, BA,OL, BL,Dw, AAV - २, d) SLD, MI& e) MD involving (a) to (d) above – १+१*, (एकूण-७) याप्रमाणे दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार कर्तव्य व जबाबदारीचा विचार करून गुणवत्ता/उपलब्धतेनुसार भरण्यात येतील. | | | | | | | | | | | |
| ८) अनाथ (१%) | ०२ | | | | | | | | | | | |

**(टीप :- * पूर्वीचा माजी सैनिक व दिव्यांग अनुशेष)**

त्याअनुषंगाने, मूळ जाहिरातीनुसार अराखीव प्रवर्ग व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा अथवा इतर मागास प्रवर्गाचा दावा करण्यासाठी, तसेच इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवारांना नव्याने समाविष्ट झालेल्या भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा प्रवर्ग निवडीसाठी, आणि सुधारित जाहिरातीमध्ये माजी सैनिक उमेदवारांना विशेष मागास प्रवर्ग (SBC) व भज-ब (NT-B) या प्रवर्गासाठी जागा उपलब्ध होत असलेने, उमेदवारांना त्यांचा विकल्प सुधारित करण्याकरीता लिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे.

१) अराखीव (खुला) (OPEN) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून (EWS) अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचे (SEBC) अथवा इतर मागास वर्गाचे (OBC) जात प्रमाणपत्र मिळाले असल्यास, अशा उमेदवारांना त्यांचा अराखीव (खुला)(OPEN) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचा(EWS) दावा बदलून त्यांच्याकडील जात प्रमाणपत्राच्या आधारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा (SEBC) अथवा इतर मागासवर्गाचा (OBC) विकल्प सादर करण्यास संधी देण्यात येत आहे.

२) अराखीव(खुला)(OPEN) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) उमेदवारांना सदर आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा आहे व ज्यांच्याकडे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचे(SEBC) अथवा इतर मागासवर्गाचे(OBC) विहित प्राधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र आणि वैध नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र असल्यास अशा उमेदवारांनी https://www.pmc.gov.in/l/recruitment या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या लिंक वर जाऊन त्यांचा नोंदणी क्रमांक प्रविष्ठ करून त्यांच्या अर्जामध्ये उक्त प्रवर्गासंबंधित विहित तपशील प्रविष्ठ करावे जेणेकरून पात्र उमेदवारांना सदर आरक्षणाचा लाभ घेता येईल.

३) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचे (SEBC) अथवा इतर मागासवर्गाचे (OBC) आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी अर्ज सादर करावयाच्या दिनांकास आर्थिक वर्षात वैध असणारे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षण अधिनियम, २०२४ अन्वये एसईबीसी प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या उमेदवारांना तसेच दि. ०७/०९/२०२३ रोजी गठीत मा. न्यायमुर्ती श्री. संदिप शिंदे (निवृत्त) समितीच्या शिफारशीनुसार राज्य शासनाच्या निर्णयान्वये कुणबी, कुणबी- मराठा व मराठा-कुणबी नोंदी सापडलेल्या राज्यातील मराठा समाजातील पात्र उमेदवारांना, इतर मागास वर्गाचे जात प्रमाणपत्र उपलब्ध झालेल्या उमेदवारांना तसेच इतर कोणत्याही सामाजीक आरक्षणाचा लाभ घेणा-या व्यक्तीस कोणत्याही परिस्थितीत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) प्रवर्गाचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

५) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा (SEBC) अथवा इतर मागासवर्गाचा (OBC) दावा करण्यासाठी विकल्प नव्याने सुधारित करून सादर केल्यास संबंधित उमेदवाराचा मुळ अर्जातील दावा रद्द समजण्यात येईल. तसेच, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गासाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करण्यासाठी विहित पध्दतीने तसेच विहित कालावधीत विकल्प सादर न करणा-या उमेदवारांचा प्रस्तुत परीक्षेकरीता यापुर्वी अर्ज सादर करताना केलेला दावा अंतिम समजण्यात येईल व सदर दावा बदलण्याची विनंती भरती प्रक्रियेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर मान्य करण्यात येणार नाही.

६) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचे (SEBC) अथवा इतर मागास वर्गाचे (OBC) जात प्रमाणपत्र मिळाले आहे, अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून (EWS) दावा केलेल्या उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) अथवा इतर मागास वर्गाचा (OBC) विकल्प सादर न केल्यास उमेदवारांचा प्रस्तुत परीक्षेकरीता यापुर्वी अर्ज सादर करताना केलेला दावा अंतिम समजण्यात येईल व सदर दावा बदलण्याची विनंती भरती प्रक्रियेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर मान्य करण्यात येणार नाही.

७) जाहिरात क्र. १/१५७९ दि.०९/०१/२०२४ नुसार इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गात भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणासाठी जागा उपलब्ध नव्हती. आता सुधारित पदसंख्येनुसार इतर मागासवर्ग (OBC) प्रवर्गासाठी एक जागा भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणासाठी उपलब्ध झाल्याने ज्या उमेदवारांनी इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गातून अर्ज सादर केलेला आहे व त्यांच्याकडे भूकंपग्रस्त प्रमाणपत्र आहे असे उमेदवार आपला समांतर आरक्षणासाठीचा दावा सुधारित करू शकतात.

८) इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गात भूकंपग्रस्त प्रमाणपत्र उपलब्ध असलेल्या यापूर्वी इतर मागासवर्ग (OBC) प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी आता भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा दावा सादर न केल्यास उमेदवाराने प्रस्तुत परीक्षेकरीता यापुर्वी अर्ज सादर करताना केलेला दावा अंतिम समजण्यात येईल व सदर दावा बदलण्याची विनंती भरती प्रक्रिये दरम्यान कोणत्याही टप्प्यावर मान्य करण्यात येणार नाही.

**९) जाहिरात क्र. १/१५७९ दि.०९/०१/२०२४ च्या अनुषंगाने विशेष मागास प्रवर्ग (SBC) व भज-ब (NT-B) या सामाजिक आरक्षणामध्ये माजी सैनिक या समांतर आरक्षणात जागा उपलब्ध नसल्याने, ज्या विशेष मागास प्रवर्ग (SBC) व भज-ब (NT-B) प्रवर्गातील माजी सैनिक उमेदवारांनी खुला (OPEN) माजी सैनिक या प्रवर्गातून अर्ज सादर केला आहे, अशा उमेदवारांनी विशेष मागास प्रवर्ग (SBC) व भज-ब (NT-B) प्रवर्गात समांतर आरक्षणामध्ये माजी सैनिक या प्रवर्गातून पुनःश्च अर्ज सादर करावा, त्यांनी अर्ज सादर न केल्यास त्यांचा मूळ अर्जातील विकल्प ग्राह्य धरण्यात येईल.**

१०) उपरोक्त कार्यपध्दती सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्रमांक ३४६८/२०२४ तसेच त्याअनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

११) सदर जाहिरातीमध्ये प्रस्तावित केलेली पदसंख्या आणि बिंदूनामावलीनुसार आरक्षणामध्ये भरती प्रक्रियेदरम्यान मे.शासनाच्या निर्देशांनुसार किंवा धोरणामध्ये काही बदल झाल्यास त्यानुसार होणारे बदल करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना राहतील.

१२) दिनांक ०९/०१/२०२४ रोजी प्रसिध्द जाहिरातीमधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

१३) सुधारित जाहिरातीच्या अनुषंगाने खुला (OPEN), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), इतर मागासवर्ग (OBC), विशेष मागास प्रवर्ग (SBC) व भज-ब (NT-B) या जात प्रवर्गातील उमेदवारांना त्यांचा जात प्रवर्ग व समांतर आरक्षण यांचा लाभ घेण्याकरीता अर्ज सादर करण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे दिलेल्या मुदतीमध्ये करणे आवश्यक आहे.

| अ.क्र | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | **आरक्षणातील दावा बदलण्यासाठीचा कालावधी** | **दि. १३/०८/२०२५ ते दि.३०/०८/२०२५** |
| २ | **अर्ज सादर करावयाचे अधिकृत संकेतस्थळ** | https://ibpsonline.ibps.in/pmcjul23 |

* परीक्षेचा दिनांक, वेळ व केंद्र प्रवेशपत्रामध्ये नमूद केले जाईल. संभाव्य बदला बाबत वेळोवेळी पुणे महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर माहिती प्रसारित केली जाईल.

सही/-XXXX
**(एम.जे.प्रदीप चंद्रन)**
**अति. महापालिका आयुक्त (ज)**
**पुणे महानगरपालिका**

**दिनांक : १२/०८/२०२५**
**ठिकाण : पुणे**